महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

==========

जावक क्रमांक – ८८/ ३४३६९०४ दिनांक :- ११ सप्टेंबर, २०२६

प्रसिद्धिपत्रक

कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाच्या नियोजित आराखड्याचे सादरीकरण व जनसंवाद कार्यक्रम संपन्न

नागरिकांच्या सहभागातून कामाठीपुराचा सर्वांगीण, नियोजित व शाश्वत विकास साधणार – संजीव जयस्वाल

मुंबई, दि. ११ सप्टेंबर २०२६ : "कामाठीपुरा हा मुंबईच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जडणघडणीचा अविभाज्य भाग आहे. या परिसराचा पुनर्विकास म्हणजे केवळ जुन्या इमारतींची पुनर्बांधणी नव्हे, तर येथील नागरिकांना सुरक्षित, सन्मानजनक आणि आधुनिक जीवनमान उपलब्ध करून देत कामाठीपुराचे सर्वांगीण, नियोजित आणि शाश्वत परिवर्तन घडविण्याची संधी आहे. नागरिकांचा सहभाग, पारदर्शकता आणि संवाद या तत्त्वांवर हा पुनर्विकास प्रकल्प पुढे नेण्यात येईल," असे प्रतिपादन म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी केले.

कामाठीपुरा परिसराच्या सर्वांगीण, नियोजित आणि नागरिककेंद्रित विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाच्या नियोजित आराखड्याचे सादरीकरण व जनसंवाद कार्यक्रम आज म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ आणि कामाठीपुरा विकास समितीच्या संयुक्त विद्यमाने प्रकल्पस्थळी अखिल पद्मशाली समाज सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास खासदार श्री. अरविंद सावंत, आमदार श्री. अमीन पटेल, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, नगरसेविका श्रीमती नसीमा जुनेजा, माजी नगरसेवक श्री. जावेद जुनेजा, मंडळाचे सहमुख्य अधिकारी श्री उमेश वाघ, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री अनिल वानखेडे आणि विकासक श्री. अनुप खंडेलवाल यांच्यासह कामाठीपुरा विकास समितीचे पदाधिकारी, स्थानिक रहिवासी, भाडेकरू, जमीनमालक आणि विविध घटकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री. जयस्वाल यांनी सांगितले की, कामाठीपुराच्या पुनर्विकासात नागरिकांच्या अपेक्षा आणि हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. पुनर्विकासाची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने आणि स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन पुढे नेण्यात येणार असून, नियोजित आराखड्याच्या माध्यमातून नागरिकांना प्रकल्पाची व्याप्ती, पुनर्वसनाचे नियोजन, प्रस्तावित सुविधा आणि भविष्यातील विकासाची दिशा स्पष्टपणे समजावी, हा या जनसंवादाचा प्रमुख उद्देश आहे.

ते पुढे म्हणाले की, "नागरिकांच्या सूचना आणि अपेक्षा जाणून घेणे हा पुनर्विकास प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे केवळ आराखडा तयार करणे नव्हे, तर त्या आराखड्याबाबत नागरिकांशी संवाद साधणे, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि आवश्यक त्या सूचनांचा सकारात्मक विचार करणे यावर म्हाडाचा भर आहे. नागरिकांचा सहभाग आणि विश्वास या प्रकल्पाच्या यशासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे."

सुमारे ३४ एकर क्षेत्रावर प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पाच्या कक्षेत सुमारे ४७५ सेस आणि २५९ नॉन-सेस इमारतींचा समावेश आहे. या प्रकल्पाशी सुमारे ८,००० हून अधिक रहिवासी व भाडेकरू, त्यामध्ये सुमारे ६,६२५ निवासी आणि १,३७६ व्यावसायिक भाडेकरू, तसेच सुमारे ८०० जमीनमालक संबंधित आहेत. पुनर्विकासाच्या माध्यमातून विद्यमान रहिवासी व भाडेकरूंचे नियोजित पुनर्वसन करण्याबरोबरच सुमारे ४,५०० अतिरिक्त गृहनिर्माण सदनिकांची निर्मिती करण्याचे नियोजन आहे.

कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्प म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत (MBRRB), DCPR 2034 मधील विनियम 33(9) अंतर्गत राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी म्हाडाला नोडल एजन्सी तसेच विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) म्हणून दर्जा देण्यात आला आहे. प्रकल्पाच्या प्रत्यक्ष विकासाची अंमलबजावणी Construction & Development Agency (C&DA) मार्फत करण्यात येणार आहे.

प्रस्तावित आराखड्यामध्ये आधुनिक व भूकंपरोधक बांधकाम तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक वास्तुरचना, पावसाच्या पाण्याचे संधारण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, हरित क्षेत्रे, आधुनिक अग्निसुरक्षा व्यवस्था, लिफ्ट सुविधा, अंतर्गत रस्ते व वाहतूक व्यवस्था तसेच आवश्यक सामाजिक व नागरी सुविधांचा समावेश करण्यात आला आहे.

श्री जयस्वाल यांनी सांगितले कि कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाच्या अनुषंगाने रहिवाशांनी केलेल्या विविध मागण्यांवर दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत म्हाडाने अनेक मागण्यांना मान्यता दिली असून, काही मागण्यांबाबत आवश्यक कार्यवाही व नियोजनाचे निर्देश देण्यात आले आहेत.

पुनर्विकासाच्या कालावधीत रहिवाशांना आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी दोन वर्षांचे आगाऊ भाडे तसेच पुढील एक वर्षाचे धनादेश देण्यास मान्यता देण्यात आली आहे. स्थलांतर व इतर अनुषंगिक खर्चासाठी एकवेळ ₹ २५,००० देण्यासही मान्यता देण्यात आली आहे. खोली, दुकान अथवा गाळा रिकामा केल्यानंतर टप्प्याटप्प्याने भाडे देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

बिगरनिवासी गाळेधारकांच्या मागणीचा विचार करून क्षेत्रफळानुसार वाढीव भाड्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार २०० चौ.फु.पर्यंत ₹२५,०००, २०० ते ४०० चौ.फु. क्षेत्रासाठी ₹३०,००० आणि ४०० चौ.फु.पेक्षा अधिक क्षेत्रासाठी ₹३५,००० प्रतिमाह भाडे देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच जमीनमालकांना पुनर्विकास कालावधीत प्रति प्लॉट ₹२५,००० प्रतिमाह भाडे देण्यास मान्यता देण्यात आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुनर्वसन इमारतींमधील सुविधांबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे. रहिवाशांनी प्रत्येक इमारतीमध्ये आठ सदनिकांसाठी ४ लिफ्टची मागणी केली होती. याबाबत विकासकाच्या प्रतिनिधीने प्रत्येक इमारतीमध्ये पाच लिफ्ट प्रस्तावित असल्याचे बैठकीत स्पष्ट केले. तसेच पुनर्वसन इमारतींची बांधकाम गुणवत्ता विक्री इमारतींच्या दर्जाप्रमाणेच ठेवण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

महिला, मुले, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक सुविधांचा विचार करण्यात आला असून, इमारतींचे आराखडे मंडळाच्या कार्यकारी अभियंतामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रस्तावित सुविधा DCPR-2034 मधील तरतुदींनुसार असतील.

पुनर्विकास प्रक्रियेत रहिवाशांना आवश्यक कायदेशीर मार्गदर्शन मिळावे यासाठी सॉलिसिटरची नियुक्ती करून त्यांचे शुल्क विकासकाने भरावे, या मागणीसही मान्यता देण्यात आली आहे.

याशिवाय प्रकल्पालगतच्या मालमत्तेतील जमीनमालक, भाडेकरू अथवा रहिवाशांना प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे. प्रकल्पाच्या कालावधीत प्रस्ताव प्राप्त झाल्यास अथवा नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक असल्यास DCPR-2034 मधील विनियम 33(9) अंतर्गत शासनाच्या मान्यतेने त्यांचा समावेश करण्याची कार्यवाही करता येणार आहे.

कामाठीपुरा समूह पुनर्विकास हा केवळ इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रकल्प नसून, या ऐतिहासिक परिसरातील नागरिकांना सुरक्षित, सुसज्ज आणि दर्जेदार निवास उपलब्ध करून देतानाच परिसराच्या पायाभूत सुविधा, सार्वजनिक जागा, वाहतूक व्यवस्था आणि पर्यावरणीय गुणवत्ता सुधारण्याचा व्यापक प्रयत्न आहे. समूह पद्धतीने पुनर्विकास झाल्यामुळे कामाठीपुराचा विकास अधिक नियोजित, समावेशक आणि शाश्वत पद्धतीने करण्यास मदत होणार आहे.

दरम्यान प्रकल्पाचे वास्तुशास्त्रज्ञ यांनी कामाठीपुरा समूह पुनर्विकास प्रकल्पाच्या नियोजित आराखड्याचे सविस्तर सादरीकरण केले. यामध्ये प्रकल्पाची संकल्पना, क्षेत्रफळ, पुनर्विकासाची व्याप्ती, लाभार्थी, पुनर्वसनाची तरतूद, निवासी व व्यावसायिक घटक, प्रस्तावित पायाभूत व सामाजिक सुविधा, हरित क्षेत्रे तसेच पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली.

स्थानिक नागरिक, भाडेकरू आणि जमीनमालकांनी प्रकल्पाबाबत आपल्या सूचना, अपेक्षा आणि प्रश्न मांडले. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत प्रकल्पाबाबत आवश्यक माहिती दिली. नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या सहभागातून पुनर्विकास प्रक्रिया पुढे नेण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री. सचिन करपे यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कामाठीपुरा विकास समितीतर्फे उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कामाठीपुरा विकास समितीचे अध्यक्ष श्री. दोन्तुल्ला बालानरसै यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री बालानरसै यांनी केले. यावेळी आमदार श्री. अमीन पटेल आणि खासदार श्री. अरविंद सावंत यांनी देखील कामाठीपुरा परिसराच्या पुनर्विकासाबाबत आपले विचार व्यक्त केले. यावेळी बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी झाल्यानंतर, समूह पुनर्विकासासाठी 'म्हाडा' हा एक सर्वोत्तम पर्याय ठरू शकतो, असा विश्वास खासदार श्री. अरविंद सावंत आणि आमदार श्री. अमिन पटेल यांनी यावेळी व्यक्त केला. स्थानिक नागरिकांना सुरक्षित आणि सन्मानजनक निवासव्यवस्था मिळण्याबरोबरच परिसरातील पायाभूत सुविधा, सार्वजनिक जागा आणि जीवनमानात गुणात्मक सुधारणा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. रमेश रापेल्ली यांनी आभार मानले.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

Maharashtra Housing & Area Development Authority
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎022-55405066/77. Email :cpromhadaoffice@gmail.com

==========

Outward No. : 88/3436904 Dt. 11 September, 2026

Press Release

Presentation of Proposed Plan and Public Interaction Programme for Kamathipura Cluster Redevelopment Project Held

Holistic, Planned and Sustainable Development of Kamathipura to be Achieved through Citizens' Participation – Sanjeev Jaiswal

Mumbai, September 11, 2026: "Kamathipura is an integral part of Mumbai's social, cultural and historical fabric. The redevelopment of this area is not merely about reconstructing old buildings; it is an opportunity to bring about the holistic, planned and sustainable transformation of Kamathipura by providing its residents with safe, dignified and modern living conditions. The redevelopment project will be taken forward on the principles of citizens' participation, transparency and dialogue," said MHADA Vice President and Chief Executive Officer Shri Sanjeev Jaiswal.

The presentation of the proposed plan and a public interaction programme for the Kamathipura Cluster Redevelopment Project, which is significant from the perspective of holistic, planned and citizen-centric development of the Kamathipura area, was held today at the project site at the Akhil Padmashali Samaj Hall. The programme was jointly organised by the Mumbai Building Repairs and Reconstruction Board (MBRRB) of MHADA and the Kamathipura Development Committee.

The programme was attended by Hon'ble Member of Parliament Shri Arvind Sawant, MLA Shri Amin Patel, MHADA Vice President and CEO Shri Sanjeev Jaiswal, Chief Officer of the Mumbai Building Repairs and Reconstruction Board Shri Milind Shambharkar, Corporator Smt. Naseema Juneja, former Corporator Shri Javed Juneja, Joint Chief Officer of the Board Shri Umesh Wagh, MHADA Deputy Chief Executive Officer Shri Anil Wankhede and developer Shri Anup Khandelwal, along with office-bearers of the Kamathipura Development Committee, a large number of local residents, tenants, landowners and representatives of various stakeholders.

Speaking on the occasion, Shri Jaiswal said that the expectations and interests of the citizens are being accorded the highest priority in the redevelopment of Kamathipura. The redevelopment process will be carried forward transparently and by taking local residents into confidence. The primary objective of the public interaction programme is to enable citizens to clearly understand the scope of the project, rehabilitation planning, proposed amenities and the future direction of development through the proposed plan.

He further said, "Understanding the suggestions and expectations of citizens is an important part of the redevelopment process. Therefore, MHADA's focus is not merely on preparing a plan, but also on engaging in dialogue with citizens regarding the plan, answering their questions and positively considering their suggestions wherever necessary. Citizens' participation and trust are extremely important for the success of this project."

The project, proposed over an area of approximately 34 acres, covers around 475 cessed buildings and 259 non-cessed buildings. More than 8,000 residents and tenants are associated with the project, including approximately 6,625 residential tenants and 1,376 commercial tenants, along with around 800 landowners. In addition to planned rehabilitation of the existing residents and tenants, the redevelopment project envisages the construction of approximately 4,500 additional residential units.

The Kamathipura Cluster Redevelopment Project is being implemented through the Mumbai Building Repairs and Reconstruction Board (MBRRB), MHADA, under Regulation 33(9) of DCPR 2034. MHADA has been designated as the Nodal Agency as well as the Special Planning Authority (SPA)

for the project. The actual development of the project will be undertaken through the Construction & Development Agency (C&DA).

The proposed plan incorporates modern and earthquake-resistant construction technology, environmentally sustainable architectural design, rainwater harvesting, sewage and solid waste management systems, green spaces, modern fire-safety systems, lift facilities, internal roads and traffic management, along with essential social and civic amenities.

Shri Jaiswal further stated that several important decisions were taken at the meeting held on August 13, 2026, regarding various demands raised by residents in connection with the Kamathipura Cluster Redevelopment Project. Giving priority to the interests of citizens, MHADA has approved several of these demands, while necessary action and planning directions have been issued regarding certain other demands.

To ensure financial stability for residents during the redevelopment period, approval has been granted for two years' advance rent along with cheques for the subsequent one year. Approval has also been granted for a one-time payment of ₹25,000 towards shifting and other incidental expenses. Rent will be paid in phases after the concerned room, shop or commercial premises is vacated.

Considering the demands of non-residential occupants, provision has been made for enhanced rent based on the area of the premises. Accordingly, monthly rent of ₹25,000 for premises up to 200 sq. ft., ₹30,000 for premises measuring 200 to 400 sq. ft., and ₹35,000 for premises measuring more than 400 sq. ft. has been approved. He also clarified that landowners will be paid ₹25,000 per plot per month as rent during the redevelopment period.

A positive approach has also been adopted regarding amenities in the rehabilitation buildings. Residents had demanded four lifts for every eight flats in each building. In this regard, the developer's representative clarified during the meeting that five lifts have been proposed in each building. An assurance has also been given that the construction quality of the rehabilitation buildings will be maintained at the same standard as that of the sale buildings.

Necessary facilities for women, children, students and senior citizens have also been taken into consideration. The building plans will be made available through the Executive Engineer of the Board. The proposed amenities will be provided in accordance with the provisions of DCPR 2034.

The demand for appointment of a solicitor to provide necessary legal guidance to residents during the redevelopment process, with the solicitor's fees to be borne by the developer, has also been approved.

In addition, a positive approach has been adopted regarding the inclusion of landowners, tenants or residents of properties adjoining the project area in the redevelopment project. If proposals are received during the project period or if their inclusion is considered necessary from the planning perspective, action may be taken to include them under Regulation 33(9) of DCPR 2034, subject to approval from the Government.

The Kamathipura Cluster Redevelopment Project is not merely a project for reconstruction of buildings; it is a comprehensive effort to provide safe, well-equipped and quality housing to the citizens of this historic locality while simultaneously improving its infrastructure, public spaces, transportation system and environmental quality. Cluster-based redevelopment will help facilitate the development of Kamathipura in a more planned, inclusive and sustainable manner.

Meanwhile, the project architect made a detailed presentation of the proposed plan for the Kamathipura Cluster Redevelopment Project. The presentation covered the project concept, area, scope of redevelopment, beneficiaries, rehabilitation provisions, residential and commercial components, proposed infrastructure and social amenities, green spaces, and environmentally sustainable development measures.

Local citizens, tenants and landowners put forward their suggestions, expectations and questions regarding the project. The concerned officials responded to their queries and provided the necessary

information about the project. Special emphasis was placed on taking the redevelopment process forward through direct dialogue with citizens and their active participation.

At the beginning of the programme, Shri Sachin Karpe welcomed the dignitaries. The dignitaries were felicitated by the Kamathipura Development Committee. A special felicitation was accorded to Shri Dontulla Balanarsai, President of the Kamathipura Development Committee. Shri Balanarsai delivered the introductory remarks.

On the occasion, MLA Shri Amin Patel and Member of Parliament Shri Arvind Sawant also expressed their views on the redevelopment of the Kamathipura area. They emphasised that, along with providing safe and dignified housing to local residents, there is a need for qualitative improvement in the area's infrastructure, public spaces and overall quality of life.

The programme concluded with a vote of thanks proposed by Shri Ramesh Rapelli.###

Sd/-
(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / MHADA

Follow us on :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

म्हाडा
MHADA

विकास आराखडा सादरीकरण
श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.)
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)

कार्यक्रमाचे अध्यक्ष
व जयस्वाल (भा.प्र. से.)
र तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
र्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)
प्रमुख पाहुणे
श्री अमीन पटेल
विधानसभा सदस्य
श्री. मिलिंद शंभरकर (भा.प्र.से.)
मुख्य अधिकारी, मुंबई इम
व पुनर्रचना मंड
ा. श्री. जावेद जुनेजा
माजी नगरसेवक
श्री. दोनतुल्ल
अध्यक्ष, कामाठीपुरा वि
कामाठीपुरा